पुण्य नगरी

# सायबर सुरक्षितता जागरूकतेसाठी शिक्षक, विद्यार्थी सन्मानित



**मुंबई :** क्विक हिलने आपल्या सीएआर उपक्रमाच्या माध्यमातून मुंबईमध्ये सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा अवॉर्ड्सचे आयोजन केले. स्वच्छेने सहभागी झालेल्या शैक्षणिक संस्था, शिक्षक आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षेविषयी, विशेषतः समाजातील वंचित घटकांमध्ये जागरूकता आणण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी या पुरस्कार सोहळ्यात त्यांचा गौरव करण्यात आला.

क्विक हील फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर आणि चार सहभागी संस्थांमधील शिक्षणतज्ज्ञ यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आले. अंधेरीमधील वालिया कॉलेज येथे हा पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता. स्वच्छेने सहभागी झालेल्या शैक्षणिक संस्थांमध्ये अलामुरी रत्नमाला इन्स्टिट्यूट ऑफ इंजीनिअरिंग अँण्ड टेक्नोलॉजी, आसनगाव; केआयएचईएसचे महाराष्ट्र कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँण्ड कॉमर्स, मुंबई; व्हीपीएमचे बी. एन. बांदोडकर कॉलेज ऑफ सायन्स, ठाणे आणि वालिया सी. एल. कॉलेज ऑफ कॉमर्स व एल. सी. वालिया कॉलेज ऑफ आर्ट्स, अंधेरी, मुंबई यांचा समावेश होता. या सोहळ्याला स्वयंसेवी संस्थांमधील १०० हून अधिक विद्यार्थी उपस्थित होते.

कॉलेज, शिक्षक आणि विद्यार्थी यांना विविध श्रेणींमध्ये पुरस्कार देण्यात आले.

Smart Mumbai Edition
Feb 17, 2023 Page No. 04